# रोजगार हमी योजना

(चर्चासत्राचा अहवाल)

Report of Seminar on EGS
Organized by NGOs / activists.
(Vrukshamitra)

**सामाजिक अभ्यास केंद्र नागपूर.**

या चर्चासत्रासाठी भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषदेच्या (ICSSR) पश्चिम विभागीय शाखेने अनुदान दिले. परंतु या पुस्तिकेतील आकडेवारी, लेख, मते इत्यादींपैकी कोणत्याही मजकूराची जबाबदारी या परिषदेची नाही.

## 'रोहयो' च्या आकडेवारीची गंमत जंमत

'रोजगार हमी योजना' ही पुस्तिका माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासनाद्वारे डिसेंबर १९७९ मध्ये प्रकाशित केली गेली. त्यामध्ये शेवटच्या पानावर वर्षवार खर्च, मजूरांची उपस्थिती व रोजगार निर्मिती दिलेली आहे. त्यातील मजूरांच्या उपस्थितीचे कमाल व किमान आकडे वगळून सरासरी आकडे घेऊन त्यावरून दर मजूराला सरासरी किती दिवस काम मिळाले ते काढले आहे.

पद्धती : $\frac{\text{रोजगार निर्मिती : मनुष्यदिन}}{\text{मजूरांची सरासरी उपस्थिती}}$ = दर मजुराला मिळालेला रोजगार (दिवस)

| वर्ष | मजूरांची उपस्थिती (सरासरी) (लाखात) | मनुष्यदिन रोजगार निर्मिती (कोटीत) | दर मजूराचे सरासरी रोजगार दिवस |
|---|---|---|---|
| १९७५–७६ | ३.३१ | १०.९५ | ३३०.८१ |
| १९७६–७७ | ४.३१ | १३.३२ | २८८.९४ |
| १९७७–७८ | ३.९१ | ११.५३ | ३००.०० |
| १९७८–७९ | ५.४५ | १६.३५ | |
| १९७९–८० | ६.८४ | २०.५४ | |
| १९८०–८१ | ५.७० | १७.१५ | |
| १९८१–८२ | ५.२० | १५.६० | |
| १९८२–८३ (सप्टेंबर) | ४.६८ | ६.०४ | |

म्हणजे १९७५–७६ ते १९७८–७९ या काळात प्रत्येक मजुराला खरोखरीच १० महिने काम मिळाले काय दर वर्षातील १० महिने रोहयोचे काम चालू होते काय ?

# सामाजिक अभ्यास केंद्र १९८३

## रोजगार हमी योजना चर्चा सत्राचा अहवाल

सामाजिक अभ्यास केंद्राने नागपूरला गो. से. महाविद्यालयात दि. १२ व १३ फेब्रुवारी १९८३ रोजी तीन सत्रांमध्ये रोजगार हमी योजनेवर (रोहयो) एका चर्चा सत्राचे आयोजन केले. त्या चर्चासत्राचा थोडक्यात अहवाल येथे प्रस्तुत केला आहे. पहिल्या सत्रात रोहयोच्या कामांवरील मजूराना संघटित करून या योजनेची अंमलबजावणी अधिक चांगली करून घेण्याच्या दृष्टीने कार्यकर्त्यांचे अनुभव हा विषय होता. दुसऱ्या सत्रामध्ये या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संघटनांमध्ये सहकार्य वाढवून या कार्याला समाजपरिवर्तनाचे साधन म्हणून उपयोग करता येईल काय व तसे शक्य असल्यास ह्या दृष्टीने कार्याची दिशा काय असावी हा विषय होता. तिसऱ्या सत्रामध्ये रोजगार हमीचे आजचे तात्त्विक स्वरूप काय आहे व तिचे भविष्यातील स्वरूप कसे असावे व एकूण परिवर्तनाचा तो भाग असावा या विषयी चर्चा झाली.

प्रत्येक विषयावर आलेले निबंध सादर केल्यानंतर पहिल्या सत्राला श्री. मोहन हिराबाई हिरालाल, दुसऱ्या सत्रात श्री. यशवंतराव पंदेरे व तिसऱ्या सत्राला श्री. वसंत पळशीकर यांनी विषयाची मांडणी करून चर्चेला सुरवात केली. तिन्ही सत्रांमध्ये सुमारे ४० जणांची उपस्थिती होती. ह्यात विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील वेगवेगळ्या शैक्षणिक व सामाजिक संस्थामध्ये व प्रत्यक्ष कार्य करणारी तसेच वेगवेगळ्या राजकीय विचारांची मंडळी होती.

पहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. प्र. ल. खरे होते. आणि नंतरच्या दोन सत्रांच्या वेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. म. गो. बोकरे होते.

### सत्र--पहिले

### अम्मलबजावणी संबधी कार्यकर्त्यांचे अनुभव

### निबंधांचे सारांश–(१) प्रा. खरात (बुलढाणा)

रोहयो सर्वप्रथम १९६५ मध्ये प्रायोगिक स्वरूपात सुरू झाली व १९७२ मध्ये त्यास एक व्यापक स्वरूप प्राप्त झाले. २६ जानेवारी १९७९ ला रोजगार हमी अधिनियम समत करण्यात आला. ह्यांची अम्मलबजावणीक रण्यास २६ सदस्यांची राज्य रोजगार हमी परिषद स्थापन करण्यात आली. १९८० पर्यंत ह्या योजने अंतर्गत रु. ३१० कोटी खर्च करण्यात आला. व ह्याद्वारे ७८.६६ कोटी श्रमदिन निर्माण झाले. ह्यात काम करणाऱ्या एकूण मजूरांपैकी ५० % मजूर स्त्रिया व ५० % अनुसूचित जाती जमातींचे लोक होते. लेखकाच्या मते योजना अयशस्वी होण्याची कारणे. कामाचे प्रतिकूल स्वरूप, मजुरीचे कमी दर, भ्रष्टाचार, मजूरी मिळण्यात दिरंगाई ही होत. योजनेच्या यशस्वीते करिता मजूरीत धान्यासह इतर वस्तूंचा समावेश व्हावा. सरकारी यंत्रणेवरील खर्चात कपात व्हावी तसेच मजूरीचा आधार म्हणून धान्याचे प्रमाण हिशोबात न घेता महागाई निर्देशाक घ्यावा.

### (२) प्रा. रा. य. भाहोरे (नागपूर)

रोहयो हा आर्थिक विकास कार्यक्रमाचा एक अविभाज्य घटक आहे. काम करण्याच्या मूलभूत हक्काची पूर्तता करण्याच्या कार्यात ही योजना मदत करते ह्यात श्रमप्रधान कार्यावर भर देण्यात आला आहे रोहयोच्या कामाचा शेती क्षेत्रावर विपरीत परिणाम होणार नाही याची काळजी घेण्यात येते. रोहयोच्या अंतर्गत जी कामे अंगिकारली जातात त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे पण दुसरीकडे अपूर्ण कामाची संख्या देखील वाढत आहे. अर्थशास्त्रज्ञ डी. टी लकडावाला ह्यांच्या पुढील संदर्भ लेखक देतात. "योजने अंतर्गत दिले जाणारे वेतन जीवन निर्वाहाइतकेच आहे. ही योजना समाजातील दुर्बल घटकांसाठी भरीव कामगिरी बजावत आहे असे निश्चितपणे म्हणता येत नाही या

व्यतिरिक्त कौशल्य निर्मिती, बचत, तांत्रिक प्रगती आणि राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ किंवा दीर्घकालीन उत्पन्नाचे वितरण या दृष्टीने या योजनेचे योगदान नगण्य आहे." लेखकांच्या निदर्शनास आलेली आणखी एक घटना अशी की नागपूर जिल्ह्यातील एकूण शेतमजूरांपैकी या योजने अंतर्गत नोंद झालेल्या शेतमजुरांच्या प्रमाणात १९७८–७९ पासून १९८१–८२ पर्यंत घट झाली आहे. १९७८–७९ ला १८.६१ % शेतमजूर रोहयोखाली काम करीत होते, तर १९८१–८२ मध्ये १२.८८ % "शेतमजूर रोहयोची कामे करीत होते.

## (३) प्रा. मनोहर पाध्ये व श्री. शांताराम पंदेरे (औरंगाबाद व वैजापूर)

१९७२ च्या भीषण दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ही योजना सुरु झाली. शासन ह्या योजनेकडे रोजगाराची तात्पुरती सोय म्हणून पाहत आहे. रोजगार मागणाऱ्यांच्या निरक्षरतेमुळे बऱ्याच बेकारांना फॉर्मस् भरणे वगैरे नीट जमत नाही. १५ दिवस शासन काम न देऊ शकल्यास बेकारी भत्ता देऊ केला गेला. पूर्वी कामे देण्याची मर्यादा गावापासून ५ किलोमीटर परिघाची होती. परंतु बेकारी भत्ता लागू केल्यानंतर ही मर्यादा जिल्ह्यापर्यंत (२५० किलोमीटर) वाढवण्यात आली. त्यामुळे म्हातारी माणसे, लहान मुले व स्त्रिया दूरवर जाऊ शकत नाहीत व काम देऊन देखील रूजू न झाल्यास बेकारी भत्ताही मिळत नाही. गॅंगपद्धतीमध्ये व पिण्याचे पाणी पुरविण्याच्या पद्धतीमध्ये जातियता पाळली जाते. ही जातियता निर्मूलन करण्यास कार्यकर्त्यांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यांच्या निदर्शनास आलेली आणखी एक प्रमुख बाब म्हणजे, गॅंगमन हा मजूरापैकीच एक जण न राहता नोकरशाहीच्या (शेवटचा का होईना) साखळीत सामील होत आहे. रोहयो अधिकारी व मजूर ह्यांच्यात तणाव निर्माण करण्यास धर्म आणि जाती ह्यांचा सतत उपयोग केला जातो. तसेच नोकरशाहीतील सामान्य अधिकारी सुद्धा मालकाच्या तोऱ्यात वावरतात व रोजगार मागणारा अधिक लाचार बनत जातो. नोकरशाहीस तिच्या कर्तव्याची जाणीव करून देणे आवश्यक आहे.

लेखकांनी असे सुचविले की कामाची चुकीची मापे, काम केलेल्या जमिनीचे चुकीचे वर्गीकरण, खोट्या हजेऱ्या इत्यादी प्रकारच्या भ्रष्टाचारावर नियंत्रण यावे. रोहयोच्या कामांमध्ये शास्त्रीयता, सामाजिकसमन्वय व दीर्घकालीन सामुदायिक संपत्तीची निर्मिती ही उद्दिष्टे असावी. परंतु सद्य: परिस्थितीत योजनेत कितीही त्रुटी असल्या तरी ती बंद पडू नये.

## श्री. वि. खांदेवाले व किशोर वाघमारे (नागपूर)

रोहयो सर्वसामान्यांकरता केवळ हंगामी रोजगारासाठी आहे व तिचा सर्वंकष दारिद्र्याशी संबंध नाही. परंतु, शासनाच्याच प्रतिपादनानुसार ग्रामीण दारिद्र्य दूर करणे हेच उद्दिष्ट विशद केलेले आहे. मजूरीच्या दरात काही भाग धान्याच्या स्वरूपात असणे आवश्यक आहे. परंतु अमेरिकेमध्ये अधिक गहू शासनाने व इतर संघटनांनी घ्यावा असे शेतकऱ्यांचे दडपण असते. अशा संस्था मग इतर देशात गहू पुरवठा करून रोजगार निर्माण करतात. तसाच प्रकार महाराष्ट्र शासन व अमेरिकेतील 'केअर' (CARE) ही संस्था यांच्या सहकार्यात घडला असावा असे मत लेखकांनी व्यक्त केले. ही योजना सुरू करतांना मजूरांना देण्यात येणाऱ्या मजुरीचा संबंध किमान पोषणक्षम आहाराशी जोडला होता. नंतर धान्य देणेच कमी केल्यामुळे हा संबंध तुटला. असे आढळले की धान्यात मजूरी मिळणाऱ्या कामाकडे मजूर अधिक धाव घेतात. म्हणून लेखकांनी असे सुचविले की धान्याच्या बरोबर डाळ व खाद्य तेल ह्यांचा देखील मजुरीत समावेश झाल्यास सर्वसामान्य लोकांचा भाववाढीपासून बचाव होईल.

## श्रीमती सुधा सॅनिस (बरोडा)

सरकारच्या रोहयो मधील सध्याचा कामांचा प्रत्यक्षात अमलात येणारा अग्रक्रम अयोग्य आहे. तो क्रम जलसंपत्तीचा विकास, वनसंपत्तीचा विकास भु–विकास योजना, रस्ते विकास असा असावा. ह्या योजनेत निर्माण होणाऱ्या संपत्तीवर गावाची सामाजिक मालकी असावी. ह्या योजनेचे लाभ प्रस्थापितांना होता कामा नये. ह्यातील सर्व प्रकल्प उत्पादक स्वरूपाचे असावे. तसेच ह्यांनी असे सुचविले की रोहयोतील ग्रामिण मजूरांच्या संघटना उभाराव्यात व त्याकरता स्वयंसेवी संघटनांनी प्रयत्नशील रहावे. रोहयोमुळे ग्रामीण संघटनाकरिता अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे.

## श्री. पन्नालाल सुराणा (सोलापूर)

कायद्यात व कागदावर ही योजना चांगली असली तरी तिची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे होत नाही. त्यांनी अशी सूचना मांडली की गेल्या ३ वर्षात ज्या वर्षी या योजनेवर सर्वाधिक खर्च आला असेल. त्याच्या दुप्पट रकमेचा वार्षिक आराखडा (ब्लूप्रिंट) असावा. ही योजना तयार करणारा तांत्रिक सेवक वर्ग पुरेसा नाही. असे निदर्शनास आणून दिले गेले की १९८१ पासून धान्याच्या स्वरूपात मजूरी देणे बंद झाले. भ्रष्टाचाराचे प्रमाण अधिक आहे. राजकीय पक्षांचे ह्या व अशा प्रकारच्या योजनांकडे दुर्लक्ष झालेले आहे. अडचण निवारण असे ह्या योजनेचे स्वरुप आहे. तरी निदान ह्या योजनेची अंमलबजावणी नीट व्हावी.

(निबंधाचा सारांश श्री. खांदेवाले यांनी सादर केला.)

## मांडणी

श्री. मोहन हिराबाई हिरालाल (चंद्रपूर) ह्यांनी विषयाची मांडणी केली. त्यांचे प्रतिपादन असे की, ही योजना राबविणे म्हणजे मानवी रोजगाराच्या हक्कासबधी शासनाचे हे एक पुरोगामी पाऊल आहे. त्यांनी योजनेतील अनेक त्रुटी व शासनाची चलाखी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. त्यांच्यामते ही योजना अयशस्वी होण्यास मजुरांचे अज्ञान, शासनाची उदासीनता, सामाजिक संस्था व अभ्यासकांची अनास्था तसेच कर भरणारांचे दुर्लक्ष ही प्रमुख कारणे होत.

## चर्चा

ह्यानंतर उपस्थित सदस्यांनी केलेल्या चर्चेत खालील मुद्दे मांडण्यात आले.

एक सदस्य म्हणाले की, ही योजना यशस्वी व्हावयाची असेल तर योजनाच्या अंतर्गत असणाऱ्या लोककर्म विभाग, वनविभाग, कृषी व वित्त या चारही खात्यामध्ये एकसूत्रीपणा असणे ही आवश्यक बाब आहे. माप घेण्याच्या पद्धतीविषयी ते म्हणाले की तलावाचे माप पाळीवरून घेतल्याने मजूरांवर अन्याय होत असला तरी खड्ड्याचे माप घेणे तांत्रिकदृष्टचा कठीण व गैरसोईचे असल्यामुळे पाळीवरून माप घेतले जाते. काही निबंधवाचकांनी जो अग्रक्रम सुचविला आहे तोच शासनाने देखील स्विकारला आहे. परंतु हा अग्रक्रम डावलून रस्त्यांच्या कामाला प्राधान्य केवळ स्थानिक राजकीय दबावामुळे मिळते. ह्यावरील खर्च मात्र सरकार एकूण खर्चाच्या ३३ % पेक्षा जास्त होऊ देत नाही.

वरीलप्रकारचे स्पष्टीकरण चुकीचें आहे असे एका सदस्याने अमरावती जिल्ह्याचे उदाहरण प्रस्तुत करून दाखविले. अमरावती जिल्ह्यात १९८१–८२ मध्ये रस्त्यांवरील खर्च ४९.७५ टक्के आहे. हे सरकारी प्रकाशनात नमूद केलेले आहे. रस्त्यांवरील खर्च ही एक गरज आहें की विशिष्ट वर्गा प्रती "बांधिलकी" आहे असा संशय व्यक्त केला. त्यांना असे प्रकर्षाने वाटले की नवनवीन योजनांचा जन्म, त्यावरील चर्चा सम्मेलने ही सर्वं दारिद्रच व विषमतेच्या मूळ समस्येपासून लक्ष विचलीत तर करीत नाहीत ना ? ह्यांनी रोहयो ही योजना म्हणजे आर्थिक नियोजनांच्या अयशस्वितेची एक पावती होय असे स्पष्ट प्रतिपादन केले.

एका सदस्याने असे मत मांडले की रोहयोमुळे आज पर्यंत कोणती व किती सामुहिक संपत्ती निर्माण झाली याची माहिती सामान्यपणे लोकापर्यंत पोहचत नाही.

दुसऱ्या सदस्याने असे उत्तर दिले की, रोहयोमुळे स्थिर संपत्ती सिंचनसोयी, पाझरतलाव, ओलीताचे कालवे, विहिरी इत्यादी स्वरुपात निर्माण झालेली आहे. यापैकी काही खाजगी स्वरुपात आहे आणि काही सामुहिक स्वरूपात एका भागात अशी मागणी केली गेली आहे की रोहयोवरील खर्च दुप्पट व्हावा परंतु शासन या योजनेवरील खर्च दुप्पट करू

शकेल असे वाटत नाही ह्या योजनेतील मजूरीदर खरे पाहता किमान दराप्रमाणे नसून रोज प्रत्यक्ष झालेल्या कामावर आधारलेले आहेत ह्या योजनेतील गॅंगपद्धती मजूरामधील स्पर्धा व कामाची गती कायम होण्यास मदत करते. परंतु ह्या सर्व योजनेत दूरदृष्टीचा अभाव बोचणारा आहे. ह्यातून निर्माण होणारी संपत्ती किमान ५० वर्षतरी समाजास उपयुक्त असावी. अशारितीने सर्व कामांचे नियोजन केले पाहिजे.

एक सदस्य म्हणाले की साधारण परिस्थितीत देण्याकरिता रोहयो ही अल्पकालीन योजना आहे ही योजना राबविताना वर्तमान रोजगारावर ह्याचापरिणाम होऊ नये. ह्या योजनेतील दोष किंवा गॅंगमनचा भ्रष्टाचार हा संपूर्ण समाजव्यवस्थेचाच अविभाज्य घटक आहे. ह्यामुळे ज्यांना समाजपरिवर्तन व्हावे असे वाटते ह्यांनी केवळ गॅंगमनचा दोषी धरणे पूर्णपणे संयुक्तिक नाही. ह्यांनी असाही मुद्दा मांडला की रोहयोची सगळी कामे अतिरिक्त नसून त्यापैकी बरीच कामें सरकारच्या इतर खात्यांच्या नियमित कामांमधून रोहयोमध्ये समाविष्ट केलेली असू शकतात. या मुद्यांचा प्रत्यक्ष परिस्थितीत अभ्यास करणे आवश्यक आहे.

समाजसेवी संघटनेच्या एका कार्यकर्त्याचे विवेचन असे कीं शासनाजवळ कामे निर्माण करण्याविषयीचा सूसूत्र असा आराखडा नाही त्यामुळेच कदाचित इतर खात्यांची कामें ह्या योजनेमार्फत राबविली जात असावी. दुसरा मुद्दा असा की स्वयंसेवी संघटना जवळ तरी असा सुसूत्र कार्यक्रम आहे का ? कोणती कामें काढली तर रोजगार वाढेल ह्याचा विचार करणे तसेच ह्याविषयीचें प्रशिक्षण कार्यकर्त्यांना देणे आवश्यक आहे. त्यात शासनास प्रत्यक्ष मदत स्वयंसेवी संघटनांनी करावी. म्हणून आपल्या सर्व संघटनांनी कायमचा रोजगार ग्रामीण लोकांना देण्याच्या दृष्टीने अभ्यास करून सूचना करणे आवश्यक आहे.

एका सदस्याने असा मुद्दा मांडला की रोहयोच्या अयशस्वितेकरिता शासनाइतकेच रोजगार शोधणारे लोकसुद्धा जबाबदार आहेत. त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की भंडारा जिल्हयात रोहयोतील मजूरांची संख्या हळूहळू कमी होत गेली.

इतरांनी त्यावर असा प्रश्न विचारला की पूर्वी कामावर येणारे हे हजारो मजूर कुठे गेले आहेत ? त्यांना इतरत्र इतक्या प्रमाणावर कुठे रोजगार मिळाला ? या प्रश्नाचे उत्तर अर्थातच नकारार्थी आहे. यामध्ये अशी बाबसुद्धा दृष्टिपथात आली की रोहयोनी कामे वेळेवर न काढल्यास मजूर इतर ठिकाणी स्थलांतरित होतात. आणि मात्र कमी मजूर कामावर येतात असे कागदोपत्री सिद्ध करू शकते. रोहयोच्या अंमलबजावणीत मजूरांच्या उपस्थिती पटाची एक प्रत रोज चावडीवर लावण्याची पद्धती आता सुरू करण्यात आली आहे. भ्रष्टाचार कमी करण्याचा शासनाचा हा एक प्रयत्न आहे. परंतु यामुळे खरोखरीच भ्रष्टाचार कमी होईल का हे पुढे दिसेलच.

● ● ● ●

# सत्र दुसरे

## संघटनात्मक प्रयत्न

अधिवेशनाचे दुसरे सत्र दि. १३–२–८३ रविवार रोजी सकाळी ९ वाजता सुरू झाले. सत्राकरिता विषय होता 'संघटनात्मक प्रयत्न.'

प्रारंभी श्री. शांताराम पंदेरे ह्यांनी विषयाची मांडणी केली. ती अशी:महाराष्ट्रात सध्या किमान २० ते २२ राजकीय व अराजकीय संघटना रोहयो संबंधी कार्य करीत आहेत. त्या सर्वांनाच हे मान्य आहे की मानवी रोजगार हक्काकरिता असणारी ही चळवळ होय. त्यांच्यामते ह्या योजनेच्यामुळे कांही गोष्टी देशात निर्माण झाल्या, जसे ग्रामीण

Pressure groups.

मजूरांना संघटित होण्यास व करण्यास एक सुवर्णसंधी चालून आली. ग्रामीण क्षेत्र हे राष्ट्राच्या आर्थिक [illegible] प्रत्यक्ष रीत्या आले. ह्याच वेळी त्यांनी अशी भिती व्यक्त केली की रोहयोची कामे कालांतराने संपणार आहेत. मग ही योजना व त्याकरिता बांधलेल्या संघटना काय कार्य करणार ? म्हणून संघटनांनी सुद्धा दीर्घ कालात रोहयो व मजूरांचे संघटन कसे टिकू शकेल याचा विचार करावा. तसेच त्यांनी सर्व स्वयंसेवी संघटनांनी एकत्र येण्याची आवश्यकता प्रतिपादन केली त्या सर्व संघटनांना कोणत्या ना कोणत्या प्रकारे सत्तेशी संबध ठेवणे अपरिहार्य असते. त्यामुळे या सर्व भिन्न उद्दिष्टांनं कार्य करतात. ह्या केवळ रोजगार मिळवून देण्यासाठी एकत्र येतात. परंतु समाज परिवर्तना-सारख्या व्यापक उद्दिष्टाकरिता एकत्र येत नाही. डॉ. वसंत देशपांडे (पुणे) ह्यांनी त्यांच्या ठाणे जिल्ह्यातील अभ्यासाच्या आधारावर असे मत मांडले की, ह्या योजनेला सुरवातीला डाव्या मंडळींनी विरोध केला. परंतु नंतर त्यांनी ह्या योजनेस पाठिंबा दिला. कदाचित कारण असे असावे की रोहयोद्वारे सर्व ग्रामीण मजूर एकत्र आणून समाज [illegible] रचना बदलण्यास संघटित प्रयत्न करता येतील. म्हणजेच रोहयो हे त्याकरिता एक साधन म्हणून उपयोगी पडेल असे लक्षात आले असेल. परंतु देशपांडे यांचे मत असे की, कोणतेही संघटन हे विचारापेक्षा भाकरीच्या आशेने लवकर होते.

रोहयोचे लाभ सांगतांना ते म्हणाले की, ह्या योजनेने स्थलांतर रोखता येते व वेठबिगारी नष्ट होऊ शकेल. परंतु त्याकरिता रोहयोची कामे वर्षभर सातत्याने निघावयास पाहिजेत. ह्या योजनेत निर्माण होणारा संभाव्य भ्रष्टाचार रोखण्याच्या दृष्टिने कार्यकर्त्यांना प्रशिक्षण द्यावे. तसेच शासनाप्रमाणेच स्वयंसेवी संघटनांनी देंखील रोहयोच्या अंतर्गत कोणती कामे काढता येतील ह्याचा विचार करावा. ह्यातून निर्माण होणारे फायदे सर्व सामान्यांना कायम स्वरुपात मिळत राहतील ह्याची जबाबदारी कार्यकर्त्यांनी घ्यावी. राजकीय पक्ष व शासन ह्यावर सर्व संघटनांनी अंकुश ठेवावा व ह्या दोहोंमधील संबंध कसे असावे ह्याचा परत एकदा विचार व्हावा.

ह्यानंतर उपस्थित सभासदांनी चर्चेस सुरूवात केली. सुरवातीलाच व्यक्त्यांनी काही मुलभूत प्रश्न सभागृहा-समोर मांडले. ते असे की रोहयो सामाजिक क्रांतीकरता पार्श्वभूमी तयार करते का ? ह्या योजनेत क्रांतीची काही बीजे आहेत का ? आपले सिद्धांत वप्रत्यक्ष अनुभव ह्यात कांही ताळमेळ आहे का इत्यादी. एक सभासद म्हणाले की सध्याच्या सामाजिक रचनेत रोहयोचे आपण स्वागत करावे. ज्यांना सामाजिक परिवर्तन हवे आहे त्यानी आपले सर्व लक्ष रोहयो ऐवजी क्रांतीवर केंद्रित करुन सामाजिक चौकटीशी झटापट करावी. कारण अशा अनेक अराजकीय संघटना रोहयोशी संबंधीत आहेत की ज्यांना सामाजिक क्रांती अभिप्रेत नाही. तर ज्यांना परिवर्तन हवे आहे अशा पूर्णत: राजकीय संघटना आहेत. ह्यातून काही संकरित मार्ग निघतो की काय ह्याचाही विचार व्हावा.

देशातील सर्व स्वयंसेवी संघटनांचा अनुभव असा की गावातील लोकांची तातडीची गरज ही जीवीत राहण्या-करता मिळणाऱ्या रोजगाराची असते. सर्व साधारणपणे संघटना ह्याच महत्वाच्या प्रश्नाभोवती कार्य करतात व त्याकरता आवश्यक ते लहान लहान संघर्ष करतात. त्यापुढे ते संघर्ष जात नाहीत. पण रोजगार हमी योजना ही चालून आलेली मोठी संधी आहे. तिचा नीट उपयोग केला जावा.

ह्या योजनेमुळे मजूरांची एक दुर्बलता अशी लक्षात आली आहे की ते देखील काम स्विकारण्याबाबत पसंती नापसंती दाखवतात. ह्यावर परिणाम करणारे घटक म्हणजे त्यांची मानसिक–सांस्कृतिक–शारीरिक जडण घडण हे होत. ह्यामुळे रोहयो ही समाज परिवर्तनास उपयोगी संघटना बांधण्याकरता उपयोगी पडेलच असे नाही. त्याकरिता श्रमिकांची मानसिक तयारी करावी लागेल. ह्या विवेचनात त्यांनी भूमी सेना ह्या संघटनेच्या कार्याची माहिती सदनास दिली.

एक वक्ते म्हणाले की, सामाजिक परिवर्तनाकरता सर्वंकष क्रान्ती आवश्यक आहे त्याकरता एखादे नवीन प्रतिमान पुढे आणणे आवश्यक आहे. सर्वंकष क्रांतीकरता सर्व लहान स्थरावरील काम करणाऱ्यांचे एकत्रीकरण आवश्यक आहे. या संदर्भात त्यांनी असे सुचविले की रोहयो वरील मजूरांची एक राज्यव्यापी संघटना बांधावी.

हे प्रत्यक्ष अमलात आणण्याकरता एक विचार पुढे आला तो असा की सर्व संघटनांचा एककिमान कार्यक्रम तयार व्हावा. ह्या किमान कार्यक्रमाकरिता सर्व संघटनांनी एकत्र येऊन एक राज्यव्यापी समर्थ असे संघटन उभारावे

रोहयोच्या अल्प व दीर्घकालीन लाभांचे एक समायोजन करुन कार्यक्रम आखावा. परंतु रोहयोमुळे सामाजिक रचना बदलेल याबर एकमत होऊ शकले नाही.

ह्यावर पूरक अशी माहिती एका कार्यकर्त्याने दिली. ती अशी की सर्व स्वयंसेवी संघटनांच्या एकत्रीकरणाची प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्याकरता ७–८ ऑगस्ट १९८२ रोजी जळगांव येथे अभ्यासक व कार्यकर्ते ह्यांचे शिबीर घेण्यात आले.

समाजातील इतर घटकांचा समावेश व पाठिंबा सर्व संघटनांनी घ्यावा अशी सूचना समोर आली. असेही मत व्यक्त केले गेले की एक खबरदारी घेणें आवश्यक आहे ती अशी की अश्या एकत्रीकरणाचे स्वरुप श्रमिक संघटनांच्या (ट्रेड युनियनच्या) सारखें नसावे.

ह्या एकत्रीकरणाकरिता जो सामान्य कार्यक्रम असावा त्याची रूपरेषा खालील प्रमाणे सुचविण्यात आली.

(१) कामे हवी असणाऱ्यांची नोंदणी नियमितपणे केली जावी
(२) मजूरीचा अंश धान्याच्या स्वरूपात असावा.
(३) रोहयोची कामे वर्ष भर चालविण्याचा आग्रह धरला जावा.
(४) प्रशासकीय रचना रोजगार हमी योजनेस अनुरूप असावी.
(५) त्याकरिता राज्यपातळीवर स्वतंत्र खाते असावे.
(६) योजनेच्या कामात अकुशल श्रमाचा हिस्सा कायम रहावा.
(७) योजनेतील कामाचे मूल्यांकन करण्याकरता सेवाभावी संघटनांनी तांत्रिक कर्मचारी वर्ग तयार करावा.
(८) कायद्याच्या चोख अंमलबजावणीकडे संघटनांनी लक्ष द्यावे.
(९) कामाचे आराखडे (ब्लू-प्रिंट) शासनानें तयार करावे.
(१०) मजुर संघटना, करदाते स्वयंसेवी संघटनांची एक समन्वय समिती शासनाने बनवावी.
(११) जीवन वेतनाचा हक्क हा जन्मसिद्ध हक्क मानावा.

● ● ● ●

# सत्र तिसरे

## 'रोहयोचे तात्त्विक स्वरुप

### निबंध–सारांश–

(१) या सत्राकरिता प्रा. बि. स. तुळपुळे, (नागपूर) आणि डॉ. दि. ध. जहागिरदार (अमरावती) यांनी निबंध लिहिले होते.

प्रा. तुळपुळे यांनी असे प्रतिपादन केले की श्रमिकांना त्यांच्या वाजवी मोबदल्यापेक्षा कमी मोबदला देऊन त्यांचे शोषण करण्यात समाजाचे बरेच वर्ग भागीदार असतात. ही शोषणाची परिस्थिती टिकवायची असेल तर बेरोजगारीचे पूर्णपणे निर्मूलन करणे शोषक वर्गाच्या हिताचे नाही. महाराष्ट्रातील शासनाच्या सर्व अंगावर शोषक वर्गाचा प्रभाव असल्यामुळे रोहयो आतापर्यंत बेकारी निर्मूलनाचे प्रभावी साधन बनू शकली नाही. उदा. भोसले मुख्यमंत्री असतांना शासनाच्या एका जाहिरातीत म्हटले आहे की त्यांच्या एक वर्षाच्या कारकीर्दीत ३, ९४, ८४, ६८५

(म्हणजे ४ कोटी) मनुष्य दिवसांचा रोजगार निर्माण झाला आणि १५,७९, ३८५ (म्हणजे १६ लक्ष) लोकांना रोजगार मिळाला. म्हणजे प्रत्येकी सरासरी केवळ २५ दिवस काम मिळाले. याचाच अर्थ असा की, एक कल्याणकारी योजना असेच तिचे स्वरूप आहे.

रोहयो हे बेकारी निर्मूलनाचे साधन बनविणे ही संघटित औद्योगिक क्षेत्रातील कामगार संघटनांची जबाबदारी आहे कारण ग्रामीण बेरोजगारी कायम राहिली तर संघटित क्षेत्रातील श्रमिकांना सध्या बरे मिळणार वेतनमान टिकू शकणार नाही.

याकरिता संघटित क्षेत्रांतील कामगार संघटनांनी एक एक जिल्हा वाटून घेऊन तेथे रोहयोची अंमल-बजावणी चांगल्या रितीने होण्यासाठी कार्य करणे आवश्यक आहे.

(२) डॉ. जहागिरदार यांनी असे प्रतिपादन केले की सध्याच्या आर्थिक स्थितीमध्ये विकासाची मंदगती लोकसंख्या वाढीचा वेग, भांडवलप्रधान उत्पादन पद्धती इत्यादीमुळे रोजगाराच्या निर्मितीवर मर्यादा पडतात. त्यामुळे शासनाने सर्वांना रोजगार पुरविण्यासाठी पुढे यावे. त्यामुळे उत्पादन आणि आर्थिक विकास होऊन अर्थव्यवस्था गतीमान होऊ शकेल.

तसेच रोहयोसाठी व्यावसायिक कर देणारांमध्ये सामाजिक जाणीव निर्माण होते आणि श्रमिकांमध्ये श्रम करून मजूरी मिळविल्याचे समाधान निर्माण होते.

(३) चर्चेकरिता विषयाची मांडणी श्री. वसंत पळशीकर यांनी केली. त्यांनो असे प्रतिपादन केले की मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी असते तेव्हा ती समाजव्यवस्थेचे एक अंग बनलेली असते. अशावेळी प्रचलित आर्थिक विकासाचा मार्ग हा बरोबर आहे की चूक आहे याची तपासणी केली पाहिजे. भारतातील बेरोजगारी ही केवळ लोकसंख्या वाढीमुळे आहे की चुकीच्या नियोजन धोरणामुळे आहे हे पाहिले पाहिजे.

(४) श्रमाला स्वयंरोजगार मिळावयाचा असेल तर त्याच्याजवळ नैसर्गिक व इतर उत्पादन-साधने पाहिजेत. सध्या या दोन्ही प्रकारच्या साधनांवर इतरांची मालकी असल्यामुळे स्वयंरोजगार निर्माण करुन घेण्याची संधी कमी उपलब्ध आहे. नाईलाजाने श्रमिकांना रोजगारासाठी परावलबी व्हावे लागते.

(१) दुसरे कारण असे की आजच्या विषम आर्थिक रचनेची मुळे भारतातील पूर्वीच्या समाजरचनेत आहेत जमीनदार हा 'यजमान' व मजूर कुटूंब आश्रित असणे, वेतन वस्तूच्या रूपाने दिले जाणे, सावकार–कर्जदार हे शोषक संबध असणे इत्यादी स्वरुपांच्या आर्थिक संबंधामध्ये वेठबिगारी व परावलंबित्व निहित होते.

(६) ब्रिटिशांनी या संबधामध्ये असलेले शोषण अधिक वाढविले. पूर्वीच्या संबधामध्ये जी काही थोडीशी माणूसकी उरली असेल ती सुद्धा नंतर नष्ट झाली. पूर्वीच्या संबंधामध्ये आश्रिताची उत्पादन साधने हिसकावून घेतली जात नसत. आता तेही होऊ लागले आहे.

(७) भारताची अर्थव्यवस्था जागतिक अर्थ व्यवस्थेशी निगडीत आहे त्यामुळे त्या–शोषक संबधामुळे ग्रामीण बेकारी वाढली. अशा व्यवस्थेतसुद्धा औद्योगीकरणामुळे ग्रामीण बेरोजगारी नाहीशी होईल. अशी अपेक्षा होती. परतु तसे घडले नाही. म्हणूनच बेकारांना कुठल्या तरी प्रकारचा तात्पुरता आधार (Relief) म्हणून रोहयो उपयोगी पडते.

(८) कायमच्या स्वरूपात सर्वांना रोजगार मिळवून देण्यासाठी दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. (१) उत्पादन साधनांच्या मालकी संबंधीच्या धारणा, मग ती खाजगी मालकी असो को रशियासारखी राष्ट्रीयकृत मालकी असो. टाकून द्यावयास हवी. (२) उद्योगांची पुर्नरचना करावयास हवी. यालाच आपण भावी क्रांतीचे सूत्र म्हणू शकतो. यादृष्टीने आपणांस नव्या स्वरुपात आदीम संस्कृतीकडे जावे लागेल.

## चर्चा

(९) चर्चेत भाग घेणाऱ्या अनेकांनी रोहयोचा संबध सामाजिक परिवर्तन व क्रांती यांच्याशी जोडला. काहींच्या मते रोहयोमध्ये सामाजिक क्रांती अभिप्रेत आहे आणि त्याच्याशी आपण शास्त्रीय समाजवाद व आधुनिक समाजवादाचे संदर्भ जोडले पाहिजेत. मनुष्य आणि निसर्ग याच्यातील संबध पुन्हा जोडले पाहिजेत. जर रोहयो मधून सामाजिक क्रांती घडणार असे अपेक्षित असेल तर तिचे प्रतिबिंब ज्या सामाजिक संघटना रोहयोंच्या कामांवरील मजुरांना संघटित करतात त्या संघटनांच्या पहिल्या पाऊलापासूनच दिसावयास पाहिजें. अशा क्रांतीचा वाहक हा शोषित व साधनरहित (dispossesed) समाजघटकच असतो. या क्रांतीच्या प्रक्रियेत उत्पादन साधनांचे न्याय्य वितरण, शेतीची पुनर्रचना, शेतमालाचे पुनर्मूल्यांकन व राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण अभिप्रेत आहे. (१०) हे सगळे होण्यासाठी आपल्याला देशाच्या पर्यायी स्वावलंबी अर्थव्यवस्थेचे चित्र स्पष्टपणे मांडले पाहिजे. अशा नव्या व्यवस्थेत साधन.वरील खाजगी मालकी संपुष्टात आणली पाहिजे. जागतिक भांडवलवादाचा परिणाम म्हणून भारतात विदेशी भांडवलाचे स्वागत झाले आहे. या धोरणाशी लढा देणे आवश्यक आहे.

(११) इतर काही सदस्यांच्या मते रोजगार हमी योजनेंचे तात्विक स्वरुप आणि महत्व लक्षात घेऊनही त्यात सामाजिक क्रांतीची बीजे आहेत असे म्हणता येणार नाही. यातील प्रमुख मुद्दे असे --ग्रामीण /कृषी औद्योगीकरणानें बेरोजगारीचा प्रश्न आपोआप सुटेल म्हणून रोजगार हमी योजनेसोबतच ग्रामीण औद्योगिकरण व्हावे अशी जी सूचना नेहमी केली जाते त्याचा अर्थ अशा औद्योगिकरणाने बेरोजगारीचे निर्मूलन होईल असा केला जाऊ नये. कारण पश्चिम युरोपमध्ये बेरोजगारी कमी आहे असे जेव्हा आपण उदाहरण देतो तेव्हा युरोपीय देशांनी १९ व्या शतकात इतर देशाचे शोषण करून बाजारपेठावर कब्जा केला व त्या मार्गाने अधिक रोजगाराची सोय करून घेतली हे विसरता कामा नये. हा मार्ग आज भारताला उपलब्ध नसल्यामुळे ग्रामीण भागात उद्योग नेल्याबरोबर तेथील बेरोजगारी हटेल असे समजणे चूक आहे.

(१२) बेरोजगारीच्या कोंडीत सापडलेल्या सत्तारूढ राजकीय पक्षाने व सरकारने रोजगार हमी योजना हे स्वतःच्या सुटकेसाठी टाकलेले एक पाऊल आहे. त्याचा सामाजिक महत्वाचा एकच फायदा असा की रोहयोंच्या निमित्ताने एकत्र येणाऱ्या मजुरांना संघटित करण्याची संधी मिळाला आहे.

(१३) रोजगार हमी योजनेमध्ये ग्रामीण मजूरांच्या मजूरीचा स्तर वाढविण्याचा प्रयत्न होतो. या प्रयत्नांना शह म्हणून शेत मालाच्या किंमतीची चळवळ कार्य करीत आहे. तसेच शहरी लोकांवर कर बसतो म्हणून त्यांचाही विरोध होण्याची शक्यता आहे. रोजगार हमी योजनेमुळे मजूर वर्गाच्या हाती थोडा पैसा येऊ लागल्यामुळे शहरातील कारखानी मालाला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे बाजारपेठ उपलब्ध होऊ लागली आहे. रोहयो मधील कामांमुळे ओलिताचा पुरवठा वाढत आहे त्याच्या वाटणी संबधी छोटया आणि मोठया शेतकऱ्यांमध्ये मतभेद आणि संघर्ष निर्माण होऊ लागले आहेत. त्यामुळे सार्वजनिक कालव्याच्या पाण्यावर कर लावून त्याचे वाटप सार्वजनिक दृष्टया न्याय्य असे केले पाहिजे. (१४) काही भाग घेणारांनी आपले अनुभव असे मांडले की रोहयोची कामे काही कालांनतर बंद पडतील अशी भिती बाळगण्याचे कारण नाही कारण रोहयो हे एक मते मिळण्याचे साधन म्हणून निर्माण केले गेले आहे. आणि त्याकरिता ते चालू ठेवणे सत्तारूढ पक्षाला आवश्यक आहे. (१५) रोहयोंच्या कामांवरील मजूरांना कांही संघटनांनी संघटित करण्याचा प्रयत्न केला तर अधिकारी वर्ग एकतर कामे काढण्याचे टाळतात किंवा दूर अंतरावर कामे काढतात. त्याच बरोबर भ्रष्टाचार, कमी मजूरांना कामावर लावणे आणि खर्चाचे प्रमाण (६०% श्रमावर आणि ४०% इतर घटकांवर) अमलात न आणणे या नेहमीच्याच बाबी झाल्या आहेत.

(१६) भ्रष्टाचारा संबधी एका संघटनेच्या कार्यकर्त्याने अशी माहिती दिली की रोहयोचा लोकांशी प्रत्यक्ष संबध येतो म्हणून त्यातील भ्रष्टाचार उघडकीस येतो. परंतु शासनाच्या इतर खात्यांमध्ये यापेक्षा कितीतरी मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार चालतो. तरी तो जनतेच्या दृष्टीस पडत नाही (१७) सरकारने नुकताच मोठया शेतकऱ्यांकडून रोहयो करवसुली सुरु केल्यामुळे खेडयांमध्ये मोठया शेतकऱ्यांच्या बैठकी भरने आणि रोहयोला विरोध करणे सुरु झाले आहे.

(१८) रोहयो दिर्घ कालात चालावयाची असेल तर शासकीय अधिकाऱ्यांना ही योजना मजूरांचे शोषण न करता राबविण्याचे प्रशिक्षण दिले पाहिजे. मजूरांविरुद्ध तिटकारा निर्माण न करता शेतकऱ्यांकडून रोहयोचा कर वसूल केला पाहिजे, आणि ६ महिने शेतीतील कामे आणि ६ महिने रोहयोची कामे असे कामांचे प्रमाण गाठले पाहिजे. काही सदस्यांनी असा मुद्दा मांडला की जरी ही योजना अस्थायी स्वरुपाची असली तरी तिच्यातून रोजगार संधी उपलब्ध होते. त्यातून नोकरशाहीला एक नवे दालन मिळाले आहे. परंतु विरोधी राजकीय पक्ष व इतर संघटनांना रोहयोवरील मजूरांना संघटीत करण्यासाठी एक नवे क्षेत्र मिळाल्यामुळें ग्रामीण क्षेत्रातील राजकारणाला थोडी गतीशिलता मिळाली आहे. तसेच सर्व प्रकारच्या शासकीय बांध कामांवर (ठेकेदारांकडून मजूर न घेता) रोहयोच्या यंत्रणेद्वारा पुरविण्याची पद्धती स्विकारल्यास ह्या योजनेला स्थायित्व प्राप्त होण्यास मदत होईल.

महत्त्वाच्या मुद्दा असा की रोहयोसारख्या महत्त्वाच्या योजनेची अंमलबजावणी नीट होण्यासाठी आवश्यक ते बदल प्रशासकीय व्यवस्थेत केले गेले नाही. हीच परिस्थती देशाच्या पातळावरील नियोजनाची अंमलबजावणी व त्यासाठी आवश्यक अशा प्रकारच्या प्रशासकीय रचनेचा अभाव यांच्या स्वरुपात दिसून येते.

काही सदस्यांनी असे म्हटले की मूळात रोहयो ही महाराष्ट्र शासनाची नसून काही विदेशी संघटनांनी त्यांच्या देशातील अतिरिक्त धान्य भारतात निर्यात करण्यासाठी निर्माण केलेली योजना आहे. उदा (Food For work FFw) कामाच्या मोबदल्यात धान्य योजना. अशा संघटना, एकीकडे बेरोजगारांना काम देऊन सामाजिक संपत्ती निर्माण केली असे दर्शवितात तर दुसरीकडे आपल्या देशातील धान्याची विक्री करण्यास मदत करतात. लक्षात घेण्यासारखा मुद्दा असा आहे की काही वर्षेपर्यंत रोहयो सुद्धा अमेरिकेतील 'केअर' (CARE-Council for American Relief Everywhere) या कार्यक्रमाशी संलग्न होती. त्यामुळे असा कार्यक्रम सामाजिक क्रान्ती घडवून आणू शकले का याची नीट तपासणी व्हावी.

सत्तारुढ़ पक्षाला सुद्धा या कार्यक्रमातून सामाजिक क्रांती होईल अशी शंका आली तर पक्षातील क्रांती विरोधी हितसंबध असा कार्यक्रम चालूच देणार नाहीत. रोहयोमध्ये होणारे भ्रष्टाचार कार्यक्रमाविरुद्ध होणाऱ्या टीका शासन जेवढ्या निःशंक मताने प्रकाशित करते त्याचा अर्थ शासन प्रगतीशील आहे असा नसून सत्तारुढ पक्षाला असा मजकूर प्रकाशित होऊन सुद्धा स्वतःच्या राजकीय प्रतिमेला धक्का पोचणार नाही याची खात्री आहे.

रोहयोच्या कामांवरील श्रमिकांना संघटित करणाऱ्या सर्वच संस्थांना रोहयोद्वारा सामाजिक क्रांती अपेक्षित असेल असे म्हणता येत नाही. आणि सर्वांची क्रांतीची संकल्पना सारखीच असेल असेही नाही.

म्हणून रोहयोशी संबधित अशा सर्व संघटनांनी एकत्र येऊन रोहयोचे स्वरूप सामाजिक बदला अनुकूल कसे करता येईल व त्यासाठी कोणकोणत्या मागण्या करावयाच्या हें निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु होणे आवश्यक आहे.